ePaper
एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना होताच महाराष्ट्रात वेगवान राजकीय घडामोडी

| वर्ष - 9 | अंक -87 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- नितीश कुमार होणार मुख्यमंत्री!
- पाकिस्तानच्या मोठ्या नेत्याची कबुली
- मुख्यमंत्र्यांनी खडसावले, मंत्री नरमले!
- बिबट्यांच्या नसबंदीला परवानगी


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 20 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### अमित शहा–शिंदे सुमारे ५० मिनिटे चर्चा: शहा साहेब, ही जबाबदारी मुख्यमंत्र्यांची आहे ना!

# शिंदेंची नाराजी दिल्लीदरबारात!

## भाजपश्रेष्ठींचे आश्वासन : “यातून मार्ग काढू, युतीची घोडदौड थांबणार नाही”

| नवी दिल्ली / मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**शिवसेनेच्या काही नेत्यांच्या पक्षांतरावरून निर्माण झालेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीअगोदरच तणाव वाढताना दिसला. याच नाराजीतून बुधवारी शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट दिल्ली गाठून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीत युतीतील अंतर्गत राजकारण, भांडणं आणि भविष्यातील निवडणूक धोरणांवर सुमारे ५० मिनिटांची महत्त्वपूर्ण चर्चा झाल्याचे समजते.**



### वाद, नाराजी आणि दिल्ली दौरा महाराष्ट्रातील सत्तासंघर्षात नवा अध्याय

देशाच्या राजधानीत झालेल्या या बैठकीत शिंदे यांनी स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. “काही नेते वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करत आहेत. विरोधकांना आयते कोलीत मिळत आहे,” असे ते शहा यांच्या समोर म्हणाले.

### युतीमध्ये अंतर्गत विसंवाद वाढला? शिंदेंचा इशारा स्पष्ट

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अगदी उंबरठ्यावर असताना, महायुतीत एकसंधता आवश्यक असल्याचे शिंदेंनी शहा यांना सांगितले. त्यांचे म्हणणे :

“विधानसभा विजयामुळे युतीचा आत्मविश्वास वाढला, परंतु काही नेत्यांमुळे युतीच्या विजयाच्या घोडदौडीत अडथळे निर्माण होऊ शकतात.”

“मी लढणारा आहे, रडणारा नाही,” असे शिंदेंनी अधोरेखित केले.

त्यावर शहा यांनी त्वरित उत्तर देत, “यातून मार्ग काढू; युतीचा विजय निश्चित,” से आश्वासन दिले.

### “मुख्यमंत्र्यांची जबाबदारी अधिक” – शिंदेंची मुंबईतील टीका

दिल्ली कार्यक्रमापूर्वीच मुंबईत शिंदेंनी नाराजीतून दिलेला वक्तव्याचा सूरही लक्षवेधी होता — “राज्यात युतीचा धर्म पाळण्यासाठी आम्ही बिहारपर्यंत जातो. भाजप नेत्यांना हे समजावून देण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांची आहे.”

त्यांच्या विधानानंतर राजकीय वर्तुळात तुफान चर्चांना सुरुवात झाली होती.

### दिल्लीतील 6, कृष्ण मेनन मार्गावर 50 मिनिटं काय झालं?

दिल्ली विमानतळावर उतरून शिंदे प्रथम त्यांच्या पुत्र, खासदार श्रीकांत शिंदे यांच्या निवासस्थानी पोहोचले. त्यानंतर सायंकाळी 6 वाजता ते अमित शहा यांच्या निवासस्थानी दाखल झाले.

स्रोतांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बैठकीत शिंदेंनी पुढील मुद्दे ठळकपणे मांडले.

### काही नेते वैयक्तिक स्वार्थापोटी निर्णय घेत आहेत.

युतीतील नेत्यांनी परस्पर टीका थांबवावी.

वक्तव्य करताना संयम आणि सामंजस्याची भूमिका ठेवल्याशिवाय नुकसान होईल.

पक्षांतराच्या गोष्टींमुळे जनतेमध्ये गैरसमज निर्माण होत आहेत.

शहांनी सर्व मुद्द्यांवर गांभीर्याने चर्चा करून समन्वय यंत्रणा मजबूत करण्याचे संकेत दिले.

## महाराष्ट्राच्या राजकारणात ‘कुछ तो बडा होने वाला है’

महाराष्ट्रातील राजकारणात काहीतरी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आज नाराज एकनाथ शिंदेंनी अमित शहांची भेट घेतली. या दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास ५० मिनिटे चर्चा झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दिल्लीतील कृष्णमेनन मार्गावरील निवासस्थानी ही बैठक झाली. बैठकीत शिवसेना नेते एकनाथ शिंदेंनी अमित शहांच्या समोर तक्रारींचा पाढा वाचला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शिवसेनेला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला जात आहे,अशी तक्रार एकनाथ शिंदेंनी शहांकडे केली आहे.

### फडणवीस–अजित पवार बैठकीने वाढली राजकीय कुजबुज

एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना होताच, लगेचच मुंबईतील वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात महत्त्वाची बैठक झाली.

### या बैठकीत चर्चा :

शिंदेंची वाढती नाराजी कशी कमी करायची?

नाराजी वाढत गेल्यास पुढील पर्याय काय?

मंत्रिमंडळ पातळीवर समन्वय कसा वाढवायचा?

राजकीय सूत्रांचे म्हणणे आहे की, आगामी निवडणुकांसाठी महायुतीचा चेहरा एकसंध ठेवण्याचा प्रयत्न या बैठकीत करण्यात आला.

### बिहार शपथविधीसाठी शिंदेंना निमंत्रण

आज, गुरुवारी, पाटणा येथील गांधी मैदानावर नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारचा शपथविधी होणार आहे. या कार्यक्रमासाठी शिंदेंना निमंत्रण असून ते उपस्थित राहणार आहेत. बिहार विधानसभा निवडणुकीत शिंदेंनी प्रचारात दोन सभा घेतल्या होत्या, त्यामुळे त्यांची उपस्थिती महत्त्वाची मानली जाते.

परंतु, महायुतीतील वातावरण तापले असल्यामुळेच शिंदेंनी एक दिवस आधी दिल्ली भेट देत भाजप नेतृत्वाला परिस्थितीची माहिती दिली, असे स्पष्ट झाले आहे.

### बदलापूरमध्ये काँग्रेसला मोठा धक्का — शहराध्यक्ष शिवसेनेत

दिल्लीला रवाना होण्यापूर्वीच शिंदेंनी राज्यात राजकीय समीकरण ढवळून काढले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बदलापुरात काँग्रेसचे शहराध्यक्ष संजय जाधव यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

त्यांच्यासह काँग्रेसचे शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत दाखल झाले. यामुळे काँग्रेसला धक्का बसला असून शिवसेनेला स्थानिक पातळीवर मोठा बळकटीचा फायदा मिळणार आहे.

### राजकीय विश्लेषण : युतीतील तणाव का वाढतोय?

सत्तेत सामील असलेल्या तीन प्रमुख घटकांमध्ये — भाजप, शिवसेना, एनसीपी (अजित गट) यांच्यातील अंतर्गत संघर्ष सतत दिसतो आहे.

**तुकडेबंदी कायदा** राज्यातील मिळकतधारकांना लाभ

# छोटे भूखंड आता विनाशुल्क नियमित!

## महसूलने निश्चित केली कार्यपद्धती

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करून झालेले जमीन व्यवहात आता नि:शुल्क नियमित आणि कायदेशीर करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यपद्धती महसूल विभागाने निश्चित केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही कार्यपद्धती जाहीर केली असून या निर्णयाचा राज्यातील ६० लाख कुटुंबांसह सुमारे तीन कोटी नागरिकांना फायदा होणार आहे.**



दरम्यान, 'तुकडेबंदी कायद्याविरोधात व्यवहार' हा सातबारा उताऱ्यावरील शेरा काढून टाकण्यात येणार असून अनेक वर्षांपासून रखडलेल्या छोट्या जमिनींचा व्यवहार कायदेशीर होणार आहे. महसूल विभागाची ही कार्यपद्धती १५ नोव्हेंबर १९६५ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या जमीन व्यवहारांना लागू राहणार आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, जमाबंदी आयुक्तांना या कार्यपद्धतीसंदर्भात पत्र पाठविण्यात आले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) या सारख्या नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रातील निवासी, वाणिज्यिक झोन, छावणी क्षेत्रातील जमिनी, प्रादेशिक आराखड्यातील अकृषिक वापरासाठी दर्शविलेले क्षेत्र आणि गावठाणांच्या हद्दीलगतचे पेरीफल क्षेत्राचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. सातबाऱ्यावर नाव लागणार गुंठेवारीने घेतलेल्या जमिनींची नोंद तुकडेबंदी कायद्यामुळे सातबारा उताऱ्यावर होत नव्हती किंवा झाल्यास ती इतर हक्कामध्ये होत होती. या निर्णयामुळे फेरफार रद्द झाल्यास जर यापूर्वी खरेदीचा फेरफार रद्द झाला असेल तर, तो पुन्हा तपासून मंजूर केला जाणार आहे. खरेदीदाराचे नाव कब्जेदार म्हणून लावले जाणार आहे.'तुकडेबंदी कायद्याविरोधात व्यवहार' असा काही शेरा सातबारा उताऱ्यावर असल्यास तो काढून टाकला जाईल. फक्त नोटरी किंवा स्टॅम्प पेपवर व्यवहार केले आहेत आणि दस्त नोंदणीकृत नाहीत, अशा नागरिकांना तलाठी किंवा मंडल अधिकारी दस्त नोंदणीसाठी प्रोत्साहित करणार आहेत. मुद्रांक शुल्क भरून दस्त नोंदणी केल्यानंतर नावे सातबारा उताऱ्यावर लावली जातील. जमीन विक्रीचा मार्ग मोकळा तुकडे नियमित झाले आणि

### 'तुकडेबंदी विरोधात व्यवहार'

गुंठेवारीने घेतलेल्या जमिनींची नोंद तुकडेबंदी कायद्यामुळे सातबारा उताऱ्यावर होत नव्हती किंवा झाल्यास ती इतर हक्कामध्ये होत होती. या निर्णयामुळे फेरफार रद्द झाल्यास जर यापूर्वी खरेदीचा फेरफार रद्द झाला असेल तर, तो पुन्हा तपासून मंजूर केला जाणार आहे. खरेदीदाराचे नाव कब्जेदार म्हणून लावले जाणार आहे.'तुकडेबंदी कायद्याविरोधात व्यवहार' असा काही शेरा सातबारा उताऱ्यावर असल्यास तो काढून टाकला जाईल.

खरेदीदाराचे नाव अधिकार अभिलेखात आल्यानंतर या जमिनींची पुन्हा विक्री करण्यास किंवा हस्तांतरण करण्यास कोणताही अडसर राहणार नाही, असे राज्य शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे शहरी आणि निमशहरी भागात वास्तव्यास असलेल्या मध्यमवर्गीय भूखंडधारकांना मोठा दिलासा मिळणार असून मालमत्तेला कायदेशीर हक्क प्राप्त होणार आहे.दरम्यान, 'तुकडेबंदी कायद्याविरोधात व्यवहार' हा सातबारा उताऱ्यावरील शेरा काढून टाकण्यात येणार असून अनेक वर्षांपासून रखडलेल्या छोट्या जमिनींचा व्यवहार कायदेशीर होणार आहे. महसूल विभागाची ही कार्यपद्धती १५ नोव्हेंबर १९६५ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या जमीन व्यवहारांना लागू राहणार आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, जमाबंदी आयुक्तांना या कार्यपद्धतीसंदर्भात पत्र पाठविण्यात आले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) या सारख्या नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रातील निवासी, वाणिज्यिक झोन, छावणी क्षेत्रातील जमिनी, प्रादेशिक आराखड्यातील अकृषिक वापरासाठी दर्शविलेले क्षेत्र आणि गावठाणांच्या हद्दीलगतचे पेरीफल क्षेत्राचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. .

# हिंजवडीचा प्रश्न 'अवजड'; ५९ हजार १९६ चालकांवर गुन्हे

## दंडात्मक कारवाई होऊनही बंदीच्या वेळेत अवजड वाहनांचा वावर

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाहनांची प्रचंड वर्दळ, अरुंद, खराब रस्ते, पायाभूत सुविधांचा अभाव, बंदीच्या वेळेतही जड-अवजड वाहनांची ये-जा अशा विविध कारणांमुळे हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्क परिसरात अपघात वाढत असल्याचे निरीक्षण पोलिसांनी नोंदविले आहे. मागील ११ महिन्यांत हिंजवडी, वाकड परिसरात अपघातामध्ये ३६ जणांचा मृत्यू झाला आहे.**



प्रवेशबंदीचे उल्लंघन करणाऱ्या अवजड वाहनांच्या ५९ हजार १९६ चालकांवर विविध गुन्हे दाखल केले असून, सहा कोटी ६७ लाख ६० हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. वाढते अपघात रोखण्यासाठी बंदीच्या वेळेत वाहने येऊ नयेत यासाठी रेडी मिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्प चालक, बांधकाम व्यावसायिकांना पोलीस नोटीस देणार आहेत.हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्क परिसरात एकशेतीसहून अधिक नामांकित कंपन्या आहेत. त्यामुळे दररोज तीन ते चार लाख लोकांची ये-जा असते. वाहनांची संख्या वाढली असून रस्ते अरुंद आहेत. रस्त्यांची दुरवस्था आहे. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणारे अभियंते हिंजवडीसह वाकड, रावेत, पुनावळे, ताथवडे परिसरात

### वाहन चालविल्याचे गुन्हे दाखल

रस्त्यावर राहिलेला राडारोडा तत्काळ हटविला पाहिजे, असे हिंजवडी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांनी सांगितले.वाढत्या वाहतूककोंडीच्या पार्श्वभूमीवर शहरात प्रवेश करणाऱ्या सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना सकाळी आठ ते बारा आणि दुपारी चार ते रात्री नऊ वाजेपर्यंत बंदी केली आहे. तरीही जड, अवजड वाहने शहरात प्रवेश करीत आहेत. हिंजवडी परिसरात बंदीच्या वेळेत ५३ हजार २१८ जड-अवजड वाहनचालकांनी वाहने हद्दीत आणली. त्यांच्यावर वाहतुकीला अडथळा, निष्काळजीपणे वाहन चालविल्याचे गुन्हे दाखल केले.

वास्तव्यास प्राधान्य देतात. त्यामुळे या भागात रहिवासीकरण वाढत आहे. मोठमोठे गृहप्रकल्प उभारले जात आहेत. बांधकामासाठी लागणारा कच्चा माल पुरविणाऱ्या रेडी मिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्पांची संख्याही अधिक आहे. बांधकाम साहित्याची वाहतूक करणारी जड,या परिसरात वाहनतळाची व्यवस्था नाही. त्यामुळे रस्त्यावरच वाहने उभी केली जातात. याशिवाय रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविणे आवश्यक आहे.

मागील पावणेचार वर्षांपासून प्रशासकीय राजवट आयुक्तांच्या मंजुरीची आवश्यकता नसल्याचा घेतला गैरफायदा

# प्रशासकीय राजवटीत अनागोंदी!

## आयुक्तांना आधारात ठेवून 262 कोटी रूपयांची विकास कामे?

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड- पिंपरी-चिंचवड महापालिकेत मागील पावणेचार वर्षांपासून प्रशासकीय राजवट सुरू असून या कालावधीत प्रचंड अनागोंदी कारभार सुरू असल्याचे वारंवार समोर आले आहे. 1 कोटीच्या आतील कामांना आयुक्तांच्या मंजुरीची आवश्यकता नसल्याचा गैरफायदा घेत अतिरिक्त आयुक्त, विभाग प्रमुखांनी 98 लाख, 99 लाख रूपयांची कामे केली. 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या आर्थिक वर्षात तब्बल 262 कोटी रुपयांची विकास कामे केली आहेत.**



या कामांबाबत आयुक्तांना माहिती नसल्याची बाब समोर आली आहे. महापालिकेत 13 मार्च 2022 पासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. नगरसेवक नसल्याने आयुक्त हेच प्रशासक म्हणून कामकाज पाहत आहेत. प्रशासकीय राजवटीत अनाश्यक विकास कामे करण्याचा सपाटा सुरू आहे. त्यामुळेच महापालिकेची ठेवी कमी झाल्या असून 560 कोटी रूपयांचे कर्ज झाले आहे. एक कोटी रुपयांच्या आतील खर्चाच्या कामांना आयुक्तांची परवानगी घेण्याची गरज नसते. त्यामुळे अनेक विभागांचे विभागप्रमुख 10 लाख ते 99 लाख रुपये खर्चाची कामे काढतात. त्या खर्चास परस्पर मान्यता देतात. त्या कामांना मंजुरी मिळाल्यानंतर ती कामे ठेकेदार किंवा पुरवठादाराकडून पूर्ण करून घेतली आहेत. त्यामुळे आयुक्तांना त्या कामांची माहिती नसल्याचे समोर आले आहे. मात्र, आयुक्तांना विकास कामांबाबत माहिती नसल्याने काम निकृष्ट दर्जाचे झाल्यास, त्यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास किंवा मोठी दुर्घटना घडल्यानंतर आयुक्तांकडून चौकशी केली जाते. त्यात त्यांनाच त्या कामावर महापालिकेकडून मोठा खर्च झाल्याचे माहिती नसते. त्या कामांबाबत आयुक्त स्वत: अंधारात आहेत. त्यावरून प्रशासकीय राजवटीतही अधिकारी कामांची लपवाछपवी करीत असल्याचे दिसून येत आहे. मर्जीतील ठेकेदारांची कामे मार्गी लावण्यासाठी विभागप्रमुख एक कोटीच्या आतील कामांना प्राधान्य देत असल्याचे दिसून येत आहे. तसेच, राजकीय दबावाला बळी पडून एक कोटीच्या आतील कामांना मंजुरी देण्याची घाई केली जात आहे. अधिकारी व ठेकदार संगनमत करून अशी कामे करतात. कोणताही दर्जा न राखता निव्वळ टक्केवारीसाठीच असे प्रकार केले जातात, असा आरोप विरोधक सातत्याने करीत आहेत. असे असले तरी, एक कोटीच्या आतील कामांना मंजुरी देण्याचे प्रकार काही थांबत नसल्याचे चित्र आहे.

### स्थापत्य विभागाची 298 कामे 100 कोटींची

4 ते 5 कोटींचे एकच काम एक कोटीच्या आत तुकडे तुकडे करून केले जात आहे. निव्वळ टक्केवारी व ठेकेदारांना सांभाळण्यासाठी हा खटाटोप केला जात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या आर्थिक वर्षांत तब्बल 262 कोटी रुपये 15 लाख रुपये खर्चाची वेगवेगळ्या विभागाची तब्बल 798 कामे करण्यात आली आहेत. त्यामध्ये सर्वाधिक 298 कामे स्थापत्य विभागाची आहेत. याच कामांवर तब्बल 100 कोटी 93 लाख 52 हजार रुपयांचा खर्च झाला आहे. त्यानंतर विद्युत विभागाने वर्षभरात 227 कामे केली असून, त्यावर 49 कोटी 17 लाखांचा खर्च, पाणीपुरवठा विभागाकडून सुमारे 50 कोटी रूपये खर्चाची एकूण 104 कामांना मान्यता दिली गेली आहे. झोपडपट्टी निर्मूलन पुनर्वसन विभागाने सुमारे 19 कोटी रुपयांची वेगवेगळी 88 कामे मार्गी लावली आहेत. उद्यान स्थापत्य विभागाने 5 कोटी रुपयांची 13 कामे, क्रीडा विभागाने 8 कोटी 10 लाखांची 15 कामे, ड्रेनेज विभागाने 10 कोटींची 18 कामे, दूरसंचार विभागाने 15 कोटींची 26 कामे आणि पर्यावरण विभागाने 5 कोटी 36 लाखांची 9 कामे एका वर्षात केली आहेत. एक कोटी रुपयांच्या आतील हा खर्च असल्याने त्या कामांना संबंधित विभागाचे अतिरिक्त आयुक्त आणि विभागप्रमुखांनी मान्यता दिली आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेत खांदेपालट!

## अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सांडभोर आणि सह आयुक्त लोणकर यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांची महापालिकेतून मूळ प्रशासकीय विभागाकडे बदली झाली आहे, त्यामुळे त्यांच्याकडे असणाऱ्या विविध विभागांचा कार्यभार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर आणि सह आयुक्त मनोज लोणकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी याबाबतचे आदेश आज जारी केले आहेत.**








आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या विभागासह अग्निशामक, अतिक्रमण, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण, विद्युत मुख्य कार्यालय, निवडणूक व जनगणना, स्थापत्य मुख्य कार्यालय तर अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्याकडे सध्याच्या विभागासह करसंकलन मुख्य कार्यालय, शिक्षण, माध्यमिक शिक्षण, समाज विकास, जलशुद्धीकरण केंद्र से. २३व क्षेत्रीय क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणारे सर्व विभाग, पाणीपुरवठा, मध्यवर्ती भांडार विभागाच्या अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच सह आयुक्त मनोज लोणकर यांच्याकडे सध्याच्या विभागासह उद्यान व वृक्षसंवर्धन, सर्व क्षेत्रीय कार्यालये, स्थापत्य या विभागांचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण व माध्यमिक शिक्षण विभागाचा कार्यभार पाहणारे सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्याकडे निवडणूक व जनगणना विभागाचा पदभार देण्यात आला आहे. तर समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे यांच्याकडे शिक्षण व माध्यमिक विभागाच्या अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महापालिकेच्या निवडणूक व जनगणना पदाचा कार्यभार स्थानिक संस्था कर विभागाचे सहाय्यक आयुक्त राजीव घुले यांच्याकडे होता. आता या विभागाचा कार्यभार सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तर राजीव घुले यांच्याकडील सहाय्यक आयुक्त निवडणूक पदाचा कार्यभार निरस्त करण्यात आला आहे.

### अतिरिक्त आयुक्तांकडे सोपविलेला अतिरिक्त पदभार

अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे - अग्निशमन, अतिक्रमण, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण, विद्युत मुख्य कार्यालय, निवडणूक व जनगणना, स्थापत्य विभाग, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर- करसंकलन मुख्य कार्यालय, शिक्षण, माध्यमिक शिक्षण, समाज विकास, जलशुद्धीकरण केंद्र से. २३ , पाणीपुरवठा, मध्यवर्ती भांडार विभाग, सह आयुक्त मनोज लोणकर- उद्यान व वृक्षसंवर्धन, सर्व क्षेत्रीय कार्यालये व क्षेत्रीय क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणारे सर्व विभाग, स्थापत्य ( उद्यान )

# माध्यमातून मूल्यांची जोपासना



## भूमिका

**ऑलिम्पिकसारख्या भव्य स्पर्धांसाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येतात. त्यांतील बहुतेक सुविधा केवळ त्या स्पर्धेपुरत्या म्हणजेच तात्पुरत्या स्वरूपातील असतात. पण अशा स्पर्धांच्या निमित्ताने शाश्वत मूल्यांचे जतन, जोपासना व संक्रमण मोठ्या प्रमाणात व्हावे यासाठीही प्रयत्न केले जातात. पॅरिस ऑलिम्पिकच्या निमित्ताने जगभर पोहोचवण्यात येणाऱ्या संदेशाविषयी...**

अधिक वेगाने, आणखी उंच आणि अधिक ताकदीने (फास्टर, हायर, स्ट्राँगर) ही तिहेरी प्रेरणा घेऊन स्पर्धांत भाग घेणारे क्रीडापटू आणि त्यांच्या जोडीला सर्वच जग महिनाभर या खेळामध्ये आकंठ रंगून जाईल. अर्थात या लेखाचा विषय ऑलिंपिकमधील खेळांची स्पर्धा, विक्रम, कोण सर्वांत जास्त जलद धावपटू आहे, कोणाला तो ‘सुवर्ण बूट’ मिळाला, कोणत्या संघाने सर्वांत जास्त पदके मिळवली याबद्दलचा नाही. तर ऑलिम्पिक स्पर्धेच्या निमित्ताने जगभरात ऑलिम्पिक म्हणजे खेळाच्या माध्यमातून जी मूल्ये समाजमानसात रुजवायची आहेत, त्याबद्दलचा आहे. खेळांमधून आपल्याला पदकांपलीकडे काय मिळवायचे आहे? तर या अटीतटीच्या स्पर्धेपलीकडे जात उत्तमता, परस्पर आदर व मैत्रीभाव या तीन मूल्यांचा जगभर प्रचार-प्रसार व्हावा व या



क्रीडाशिक्षणातून अधिक उन्नत असा समाज निर्माण व्हावा. हा लेख त्या तीन मूल्यांबद्दल...उत्तमता या शब्दाची पहिली ओळख शाळा महाविद्यालयात झाली १९७० च्या दशकात, तीन अगदी वेगळ्या स्रोतांद्वारे! सावरकरांची कविता त्यात पहिली. मग जसे खेळाचे वेड लागले तसे सर्जी बुबका या रशियन (युक्रेनी) बांबू उडी (पोल व्हॉल्ट) मारणाऱ्या खेळाडूबद्दल वाचनात येऊ लागले. बांबू उडी हा अत्यंत अवघड खेळ. सर्जी बुबकाचा जन्म डिसेंबर १९६३मध्ये झाला. त्याला अशक्य असे बहुधा काहीच नव्हते. त्याची प्रत्येक उडी नवीन विक्रमाकडे जाणारी होती. कधी काळी असंभवनीय वाटणारी सहा मीटरची उंची (सुमारे २० फूट) त्याने पार केली. प्रत्येक उडीत इतर स्पर्धक बाद होत असताना त्याची पुढची उडी मात्र स्वत:शीच स्पर्धा करणारी असे. इंग्रजीतील ‘रेझ द बार’ (रेझ द बार) हा वाक्प्रचार बहुधा सर्जीमुळेच आला असावा, इतपत शंका यावी असा तो उंच उंच जात असे. जुलै १९९४ मध्ये ६.१४ मीटरच्या उडीसह त्याने १७ वा आणि अंतिम विश्वविक्रम नोंदविला! तो मोडायला २०२४ हे वर्ष उजाडावे लागले. पुरुषांसाठी सध्याचा पोल व्हॉल्ट जागतिक विक्रम एप्रिल २०२४ मध्ये अमेरिकेत जन्मलेल्या स्वीडिश व्हॉल्टर आर्मंड डुप्लांटिसने ६.२४ मीटर या नव्या उंचीवर नेऊन ठेवला. बुबकाच्या पुढे दोनच आहेत. हे वाचताना हेही लक्षात घेतले पाहिजे की गेल्या काही वर्षांतील विक्रम हे फायबरचे हलके पण ताकदवान व तरीही लवचीक पोल वापरून नोंदविण्यात आले आहेत. असो. याच काळात जगावर राज्य केले रोमानियाची नादिया कोमानेसी हिने. १९७६ च्या मंट्रियाल येथील ऑलिम्पिक स्पर्धेत तिने जणू काही बालपणातच (१४ वर्षे) प्रथम जिम्नॅस्टिक्स या अत्यंत अवघड खेळात १० पैकी १० म्हणजे ‘परफेक्ट टेन’ गुण मिळवले. आणि एकदा नाही तर त्याच स्पर्धेत आणखी सहा वेळा! इंग्रजीत ‘परफेक्ट टेन’ म्हणजे कधीही न चुकणारा. ती कधी चुकतच नसे! तिची प्रत्येक हालचाल अतिशय डौलदार, सुबक आखीवरेखीव असे. अनेक कसरती करून जमिनीवर उतरतानाचे म्हणजे लँडिंगचे दृश्यही अतिशय देखणे आणि १०० टक्के अचूक असे. हेही स्मरणात ठेवले पाहिजे की त्यावेळी आजसारVखे प्रगत दर्जाचे संगणक, कॅमेरा साहित्य नव्हते! नंतरही नादिया चर्चेत येण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे रोमानियातील कम्युनिस्ट पक्षधार्जिणे सरकार आणि पोलिसांच्या सततच्या टेहळणीला आणि स्वातंत्र्याच्या संकोचाला कंटाळून तिने नोव्हेंबर १९८९ मध्ये गुपचूप हंगेरीची सीमारेषा ओलांडली. पुढे तिने अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले. जिम्नॅस्ट म्हणून निमुळत्या पट्टीवर देखणी हालचाल करणारी नादिया म्हणजे उत्तमत्तेचे पर्यायी नाव.याच सुमारास म्हणजे १९८२ मध्ये अमेरिकन उद्योग जगतातील उदाहरणावर आधारित अनेक उद्योगांच्या उत्तमतेच्या सुरस कथा जगासमोर आणल्या एका पुस्तकाने.

## प्रासंगिक »

# पुराण पक्षफोडकांचे

***एरवी विरोधी पक्षात राहावयाची ‘अवदसा’ ओढवल्यावर राजकीय पक्षी स्थलांतर करतात.***

फार वर्षांपूर्वी महाराष्ट्रात आरोग्य खात्याने एक मोहीम चालविली होती. त्यासाठी “देवीचा रोगी कळवा आणि एक हजार रुपये मिळवा”, अशी हाक गावोगाव दिली गेल्याचे जुन्या-जाणत्यांस स्मरावे. त्यामुळे राज्याचे आरोग्यजीवन निश्चित सुधारले आणि देवीच्या रोगाचे उच्चाटन झाले, हे आरोग्य खात्याचे यश. अलीकडच्या काळात प्रदूषणादी कारणांनी राज्याचे शारीरस्वास्थ्य बिघडत चाललेले असताना त्यास राजकीय प्रदूषणाची जोड मिळून सामाजिक स्वास्थ्यही धोक्यात आल्याचे दिसते. अशा प्रसंगी श्रीश्री रविशंकर, सद्गुरू आदींनी आरोग्य सुधारासाठी नवी मोहीम हाती घेण्याची गरज आहे. या दोघांस (राज)योगाचार्य रामदेव बाबा यांचाही आशीर्वाद निश्चित लाभू शकेल. हे वा असे मिळून राजकीय-कांती गुटिका बाजारात आणून गाठीस चार पैसे जोडू शकतील. तसे करण्याआधी त्यांस एक घोषणा द्यावी लागेल. “कोण कोणत्या पक्षात आहे.

बेरोजगारीच्या मुद्द्यावरून वारंवार लक्ष्य ठरत असलेल्या सरकारने अर्थसंकल्पात उत्पादन आणि महसुलाला प्रोत्साहन देण्याऐवजी रोजगारनिर्मितीवर भर दिला आहे. मनुष्यबळात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे गरजेचे आहे...

# नोकऱ्या, लहान व्यवसायांवरचा भर स्वागतार्ह!

नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतरचा त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प होता. त्यात मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाच्या आर्थिक धोरणांची मांडणी करण्यात आली आहे. या धोरणांना या सरकारबरोबर आघाडीत असलेल्या एनडीएतील मित्रपक्षांकडूनही मंजुरी मिळणे आवश्यक आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे हे सातवे विक्रमी सादरीकरण होते. हा अर्थसंकल्प पुढील वर्षीचा नवीन अर्थसंकल्प सादर होण्यापर्यंत म्हणजे आता फक्त सहा महिन्यांपुरताच असला तरी, तो सरकारची आर्थिक दृष्टी स्पष्ट करतो. या अर्थसंकल्पात रोजगारनिर्मिती, कौशल्य आणि प्रशिक्षण, तरुणांसाठी प्रशिक्षण, लहान व्यवसायांना प्रोत्साहन देण्यावर सरकारने भर दिलेला दिसत आहे. कोळसा आणि जिवाश्म इंधनापासून अधिक हरित आणि शाश्वत ऊर्जा स्रोतांकडे संक्रमण होत असल्याने देशाच्या ऊर्जा आव्हानांचीही त्यात



दखल घेतली गेल्याचे दिसत आहे. त्यामुळे सार्वजनिक – खासगी भागीदारीसह अणुऊर्जेचा उल्लेख महत्त्वाचा आहे, तसेच साठविलेल्या पाण्यापासून ऊर्जानिर्मितीचे धोरणही महत्त्वाचे आहे.२०२४-२५ च्या या केंद्रीय अर्थसंकल्पाचा मुख्य भर रोजगारनिर्मिती आणि छोट्या व्यवसायांना मदत करण्यावर आहे. रोजगार निर्माण करणे आणि कौशल्य प्रोत्साहनाला प्राधान्य आहे. छोट्या व्यवसायांना बिनव्याजी कर्ज देऊन निर्यात बाजारांमध्ये त्यांना सहज प्रवेश मिळवता यावा यासाठी सक्षम केले जाणार आहे. भांडवली नफ्यावरही कर वाढला आहे. हे ज्यामध्ये मानवी भांडवल विकसित होणे अपेक्षित आहे, अशा श्रमकेंद्रित विकासवाढीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असू शकते. गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकारने रस्ते आणि विमानतळांसारख्या पायाभूत सुविधांवरील खर्च जाणीवपूर्वक वाढवला आहे. ही साधनसंपत्ती वेगाने विकसित केली गेली आहे आणि ती विकसित झाली आहे, हे दिसते आहे. पायाभूत सुविधांवरील सार्वजनिक खर्च हा विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. पण त्याचबरोबर रोजगारनिर्मितीचा वेग कायम राहिलेला नाही आणि ग्रामीण भागातील वेतन रखडले आहे. रोजगार निर्माण करणारे छोटे उद्योग अडचणीत आले आहेत. सकल राष्ट्रीय उत्पादनापेक्षा ग्राहकांचा खर्च कमी आहे, ही बाब चिंताजनक आहे. दीर्घकालीन, शाश्वत आणि सर्वसमावेशक वृद्धीसाठी भारताला मनुष्यबळात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे गरजेचे आहे. ती जीडीपीच्या सहा टक्क्यांपर्यंत म्हणजे सध्याच्या गुंतवणुकीच्या दुप्पट होणे आवश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**महायुतीमधील धुसफूस** सुरुवात तुम्ही केली, यापुढे पक्षप्रवेशांची पथ्ये पाळा

# मुख्यमंत्र्यांनी खडसावले, मंत्री नरमले!

## महायुतीत अंतर्गत नेते पळवापळवी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मित्रपक्षांचे माजी आमदार आणि पदाधिकाऱ्यांना पक्षप्रवेश देण्याची चढाओढ शिवसेना भाजपमध्ये सुरू झाल्याने महायुतीमधील धुसफूस मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत चव्हाट्यावर आली भाजपने चालवलेल्या पक्षप्रवेशांवरून नाराज झालेल्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी आधी मंत्रिमंडळ बैठकीकडे पाठ फिरवली आणि नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन गाहाणे मांडण्याचा प्रयत्न करताच या मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांचे खडेबोल ऐकावे लागले.**



यापुढे दोन्ही पक्षांनी पक्षप्रवेशाची पथ्ये पाळावीत, असे मुख्यमंत्र्यांनी शिंदे यांच्या मंत्र्यांना शिंदे यांच्यासमोरच सुनावले. मुख्यमंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनीही सामोपचाराची भूमिका घेत आपल्या मंत्र्यांना समजावल्याचे समजते. राज्यात नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून स्थानिक पातळ्यांवर नवी राजकीय समीकरणे आणि नवे घरोबे तयार होत आहेत. त्यातच, महायुतीत एकमेकांचे माजी आमदार, माजी नगरसेवक आणि पदाधिकारी फोडण्याचे प्रकार सुरू झाले. ऑपरेशन लोटस विरुद्ध ऑपरेशन टायगर असाही उल्लेख या फोडाफोडीचा केला जाऊ लागला. कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खांदेश, विदर्भ अशा राज्यांच्या प्रत्येक भागांत शिवसेना विरुद्ध भाजप आणि कुठे राष्ट्रवादी विरुद्ध भाजप अशी सुरू झालेली ही फोडाफोडी अखेर पोहोचली ती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात ठाणे जिल्ह्यात! शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकल्याचे वृत्त फेटाळताना भाजप नेते व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महायुतीमधील कुठलाही नेता एकमेकांच्या पक्षात जाणार नाही, असे आधीपासून ठरलेले आहे. पण मधल्या काळात काही अपरिहार्य घटना घडल्या. भाजपमधील काही नेते एकनाथ शिंदे यांच्या पक्षात गेले. शिंदेकडील काहीजण अजित पवार तर अजित पवारांकडील काही पदाधिकारी आमच्याकडे आले. आता अशा प्रकारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे एकत्र बसून निर्णय घेतील, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.आणि पदाधिकाऱ्यांना पक्षप्रवेश देण्याची चढाओढ शिवसेना भाजपमध्ये सुरू झाल्याने महायुतीमधील धुसफूस मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत चव्हाट्यावर आली भाजपने चालवलेल्या पक्षप्रवेशांवरून नाराज झालेल्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी आधी मंत्रिमंडळ बैठकीकडे पाठ फिरवली आणि नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन गाहाणे मांडण्याचा प्रयत्न करताच या मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांचे खडेबोल ऐकावे लागले.

### मित्रपक्ष बनली डोकेदुखी

उल्हासनगर महापालिकेवर भाजपची एकहाती सत्ता येणार असे दिसताच तिथे शिंदे गटाने टीम कलानीशी हातमिळवणी केली आणि संयुक्त ऑपरेशन टायगर हाती घेत भाजपचे सहा नगरसेवक टीम ओमी कलानीच्या 'दोस्ती का गठबंधन'मध्ये आणून बांधले. भाजपच्या रणनीतीला सेनेने हा धक्का दिल्याने भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण दुखावले गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही नाराज झाले.

यापुढे दोन्ही पक्षांनी पक्षप्रवेशाची पथ्ये पाळावीत, असे मुख्यमंत्र्यांनी शिंदे यांच्या मंत्र्यांना शिंदे यांच्यासमोरच सुनावले. मुख्यमंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनीही सामोपचाराची भूमिका घेत आपल्या मंत्र्यांना समजावल्याचे समजते. राज्यात नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून स्थानिक पातळ्यांवर नवी राजकीय समीकरणे आणि नवे घरोबे तयार होत आहेत.



# बिबट्यांच्या नसबंदीला परवानगी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची बिबट्यांसदर्भात माहिती

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी केंद्राकडून मिळाली आहे. त्यामुळे दीर्घकालीन उपाययोजनेत नरभक्षक बिबट्यांना शोधून नसबंदी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी बिबट्यांसदर्भात झालेल्या बैठकीत दिले.**

या मंत्रालयात झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, मुख्य सचिव राजेश कुमार, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद सिंगल, राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक एम. श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास रेड्डी, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे अनेक ठिकाणी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बिबट्यांचा वावर असलेल्या ठिकाणी पोलिस व वन विभागाने गस्त वाढवावी. तसेच, बिबट्यांचा वावर असलेल्या पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील भागांमध्ये शाळांची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी ४



अशी करण्यात यावी.बिबट्यांना जंगलात भक्ष्य मिळावे, यासाठी उपाययोजना करण्याची सूचना वनमंत्री गणेश नाईक यांनी केली. बिबट्यांचा समावेश शेड्यूल एकमध्ये असल्याने नरभक्षक बिबट्यांना पकडणे, त्यांना मारणे यावर मर्यादा येतात. त्यामुळे बिबट्यांना शेड्यूल एकमधून काढण्यासंबंधी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. पिंजरे, वाहने, मनुष्यबळ आदी बिबटे पकडण्यासाठी आवश्यक साहित्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून द्यावा, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी केंद्राकडून मिळाली आहे. त्यामुळे दीर्घकालीन उपाययोजनेत नरभक्षक बिबट्यांना शोधून नसबंदी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी बिबट्यांसदर्भात झालेल्या बैठकीत दिले. या मंत्रालयात झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद सिंगल, राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक एम. श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास रेड्डी, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आदी उपस्थित होते.

### शाळांची वेळ बदलावी

बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे अनेक ठिकाणी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बिबट्यांचा वावर असलेल्या ठिकाणी पोलिस व वन विभागाने गस्त वाढवावी. तसेच, बिबट्यांचा वावर असलेल्या पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील भागांमध्ये शाळांची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी ४ अशी करण्यात यावी.

## पाटण्यातील गांधी मैदान येथे मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडेल

# नितीश कुमार होणार मुख्यमंत्री!

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपापेक्षा चार आमदार कमी निवडून येऊनही बिहारचे पुढचे मुख्यमंत्री म्हणून नितीश कुमार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. गुरुवारी (२० नोव्हेंबर) पाटण्यातील गांधी मैदान येथे नितीश कुमार मुख्यमंत्रीपदाची दहाव्यांदा शपथ घेतील. मागच्या दोन दशकांपासून मधल्या काही वर्षांचा अपवाद वगळता जनता दल (युनायटेड) पक्षाचे सर्वेसर्वा नितीश कुमार बिहारचे मुख्यमंत्री आहेत.**

### मंत्रिमंडळाचा शपथविधी




### ७४ वर्षीय दहाव्यांदा मुख्यमंत्री

होपच्या उत्कृष्ट खेळीमुळेच वेस्ट इंडिजने ३४ षटकांत २४७ धावांचा पल्ला गाठला. शे होपने ६९ चेंडूत १३ चौकार व ४ षटकारांसह १०९ धावांची उत्कृष्ट केळी केली. याशिवाय कोणताच फलंदाज ३० धावांचा टप्पा पार करू शकला नाही.न्यूझीलंडविरुद्ध वेस्ट इंडिजची सुरुवात खराब झाली. संघाने ४० धावांच्या आत दोन विकेट गमावल्या आणि ८६ धावांपर्यंत पोहोचताच निम्मा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. दुसऱ्या टोकाला उभे राहून, शे होपने आपल्या संघाला संघर्ष करताना पाहून खेळपट्टीवर पाय घट्ट रोवून उभा होता.

बुधवारी सायंकाळी नितीश कुमार यांनी राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांची भेट घेऊन एनडीए सरकारच्या सत्तास्थापनेचा दावा केला. निवडणुकीत भाजपा-जदयूच्या युतीने २४३ पैकी २०२ जागा जिंकून प्रचंड विजय मिळवला होता. त्यानंतर नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. राज्यपालांनी राजीनामा स्वीकारत त्यांच्याकडे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कार्यभार दिला होता.७४ वर्षीय नितीश कुमार दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेऊन विक्रम स्थापन करणारे पहिलेच नेते ठरणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि अनेक राज्यांचे मुख्यमंत्री गुरूवारी होणाऱ्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित असतील. राजभवन येथे राज्यपालांची भेट घेण्यापूर्वी बिहार विधानसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये एनडीएच्या नवनिर्वाचित २०२ आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत नितीश कुमार यांची एनडीएचे नेते म्हणून एकमताने निवड झाली. २००५ पासून नितीश कुमार बिहार विधान परिषदेचे सदस्य आहेत.तसेच भाजपा आमदारांच्या बैठकीत पक्षाचे केंद्रीय निरीक्षक आणि उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांनी सम्राट चौधरी यांची भाजपा विधिमंडळ पक्षाचे नेते आणि विजय कुमार सिन्हा यांची उपनेते म्हणून निवड केली. तसेच हे दोघेही बिहारच्या नव्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री असतील, अशी घोषणा केली.सम्राट चौधरी यांनी तारापूर विधानसभेतून विजय मिळवला आहे तर सिन्हा यांनी लखीसराय मतदारसंघातून विजय मिळवला.

१४ नोव्हेंबर रोजी लागलेल्या निकालात एनडीएने २४३ जागांपैकी २०२ जागा जिंकल्या. यात भाजपाच्या ८९, जदयूच्या ८५, लोजप (रामविलास) १९, हमच्या ५ आणि आरएलएम पक्षाच्या ४ जागांचा समावेश होता. भाजपापेक्षा चार आमदार कमी निवडून येऊनही बिहारचे पुढचे मुख्यमंत्री म्हणून नितीश कुमार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. गुरुवारी (२० नोव्हेंबर) पाटण्यातील गांधी मैदान येथे नितीश कुमार मुख्यमंत्रीपदाची दहाव्यांदा शपथ घेतील. मागच्या दोन दशकांपासून मधल्या काही वर्षांचा अपवाद वगळता जनता दल (युनायटेड) पक्षाचे सर्वेसर्वा नितीश कुमार बिहारचे मुख्यमंत्री आहेत. बुधवारी सायंकाळी नितीश कुमार यांनी राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांची भेट घेऊन एनडीए सरकारच्या सत्तास्थापनेचा दावा केला. निवडणुकीत भाजपा-जदयूच्या युतीने २४३ पैकी २०२ जागा जिंकून प्रचंड विजय मिळवला होता. त्यानंतर नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. राज्यपालांनी राजीनामा स्वीकारत त्यांच्याकडे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कार्यभार दिला होता.७४ वर्षीय नितीश कुमार दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेऊन विक्रम स्थापन करणारे पहिलेच नेते ठरणार आहेत. नवनिर्वाचित २०२ आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत नितीश कुमार यांची एनडीएचे नेते म्हणून एकमताने निवड झाली. २००५ पासून नितीश कुमार बिहार विधान परिषदेचे सदस्य आहेत.तसेच भाजपा आमदारांच्या बैठकीत पक्षाचे केंद्रीय निरीक्षक आणि उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांनी सम्राट चौधरी यांची भाजपा विधिमंडळ पक्षाचे नेते आणि विजय कुमार सिन्हा यांची उपनेते म्हणून निवड केली.

## पाकिस्तानच्या मोठ्या नेत्याची कबुली

# ‘आम्ही लाल किल्ल्यापासून ते काश्मीरपर्यंत हल्ले केले’

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तानकडून दहशतवादाला खतपाणी घातले जाते, हा आरोप भारताने अनेकदा पुराव्यांसह केलेला आहे. संयुक्त राष्ट्रासारख्या आंतरराष्ट्रीय मंचावरही भारताने पाकिस्तानचा खोटारडेपणा उघड केला होता. यानंतर आता पाकिस्तानचे मोठे नेते चौधरी अन्वरुल हक यांनीच याची मोठी कबुली दिली आहे. चौधरी अन्वरुल हक हे पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरचे माजी पंतप्रधान राहिलेले आहेत.**

चौधरी अन्वरुल हक यांनी पाकिस्तानच्या संसदेत बोलताना सांगितले, “मी आधीच म्हणालो होतो. तुम्ही जर बलुचिस्तानमध्ये रक्तपात करत राहिलात तर आम्ही लाल किल्ल्यापासून काश्मीरच्या जंगलात शिरून भारतावर हल्ले करू. अल्लाहच्या कृपेने, आम्ही काही दिवसांतच आतमध्ये घुसून असे हल्ले केले की, आजपर्यंत मृतदेहांची गिनती सुरू आहे.”चौधरी अन्वरुल हक यांच्या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.१० नोव्हेंबर रोजी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ एका चालत्या गाडीत मोठा स्फोट झाला होता. या स्फोटात १४ जणांचा मृत्यू झाला. चौधरी



अन्वरुल हक यांनी केलेल्या टिप्पणीत लाल किल्ला आणि काश्मीरच्या जंगलाचा उल्लेख केला आहे. त्यावरून ते २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याकडे इशारा करत असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात २६ लोकांचा मृत्यू झाला होता. पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला पोहोचली असून त्यापासून तेथील जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी पाकिस्तानचे नेते

### आजपर्यंत मृतदेहांची गिनती सुरू

काश्मीरचे माजी पंतप्रधान राहिलेले आहेत. चौधरी अन्वरुल हक यांनी पाकिस्तानच्या संसदेत बोलताना सांगितले, “मी आधीच म्हणालो होतो. तुम्ही जर बलुचिस्तानमध्ये रक्तपात करत राहिलात तर आम्ही लाल किल्ल्यापासून काश्मीरच्या जंगलात शिरून भारतावर हल्ले करू. अल्लाहच्या कृपेने, आम्ही काही दिवसांतच आतमध्ये घुसून असे हल्ले केले की, आजपर्यंत मृतदेहांची गिनती सुरू आहे.

बलुचिस्तानमधील अशांततेसाठी वारंवार भारताला दोष देत आहेत. भारताने हे दावे त्या त्या वेळी फेटाळून लावलेले आहेत. तसेच पहलगामच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने सिंधू जल कराराला स्थगिती दिली. तसेच ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानमध्ये शिरून दहशतवाद्यांचे तळ उध्वस्त केले. पाकिस्तानकडून दहशतवादाला खतपाणी घातले जाते, हा आरोप भारताने अनेकदा पुराव्यांसह केलेला आहे. संयुक्त राष्ट्रासारख्या आंतरराष्ट्रीय मंचावरही भारताने पाकिस्तानचा खोटारडेपणा उघड केला होता. यानंतर आता पाकिस्तानचे मोठे नेते चौधरी अन्वरुल हक यांनीच याची मोठी कबुली दिली आहे.

# झीनत अमान यांनी शूट केलेलं 'दम मारो दम' गाणं

झीनत अमन बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहेत. आज त्या त्यांचा ७६वा वाढदिवस साजरा करीत आहेत. त्यांनी आजवर अनेक चित्रपटांत काम करीत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. पण, त्या दिवंगत अभिनेते देव आनंद यांच्याबरोबर काम केलेल्या 'हरे रामा हरे कृष्णा' चित्रपटामुळे प्रसिद्धीझोतात आल्या. हरे रामा हरे कृष्णा या चित्रपटातील दम मारो दम हे गाणं त्या काळी खूप गाजलेलं. तर आजही या गाण्याची क्रेझ कमी झालेली नाही. अनेक तरुण आजही पार्ट्यांमध्ये त्या गाण्यावर थिरकताना दिसतात. पण, तुम्हाला माहीत आहे का, या गाण्याच्या शूटिंगदरम्यान झीनत अमान यांनी नशेत असलेल्या लोकांबरोबर काम केलं होतं आणि त्यांनी स्वत:सुद्धा नशा केलेली, ज्यामुळे त्यांच्या आई खूप रागावलेल्या. 'जनसत्ता'च्या वृत्तानुसार अभिनेत्रींनी स्वत: याबद्दल एका पोस्टमधून माहिती दिली होती.१९७१ मध्ये आलेल्या हरे रामा हरे कृष्णा या चित्रपटातील 'दम मारो दम' या गाण्यासाठी झीनत अमान यांनी हातात चिलीम धरून अनेक लोकांसमोर नृत्य केलं होतं. उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार एरवी अशा प्रकारच्या गाण्यांसाठी कलाकार फक्त नशेत असल्याचा अभिनय करतात. पण, त्या गाण्याच्या शूटिंगदरम्यान झीनत अमान या खरोखर नशेत होत्या आणि त्यांच्याबरोबर जे लोक नृत्य करीत होते, तेसुद्धा नशेत होते. आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या या प्रसिद्ध गाण्यामागचा किस्सा जाणून घेऊयात.झीनत यांनी स्वतः त्यांच्या एका पोस्टमध्ये याबद्दल सांगितलेलं. त्यांनी लिहिले, "आम्ही काठमांडूमध्ये 'हरे रामा हरे कृष्णा'चे चित्रीकरण करीत होतो आणि देवसाहेबांनी रस्त्यावरून हिप्पींचा एक गट गाणे गाण्यासाठी एकत्र केला होता. 'दम मारो दम!' हे ते गाणे होते. हिप्पी खूप आनंदी होते. त्यांना केवळ चरस मिसळलेली चिलीम पिण्याची संधी मिळत नव्हती. त्यांना बॉलीवूड चित्रपटात काम करण्यासाठी मोफत जेवण आणि पैसेदेखील मिळत होते."झीनत यांनी पुढे लिहिलेलं, "देव आनंद यांना हा सीन खूप खरा वाटेल, असा करायचा होता. माझं पात्र असलेल्या जेनिसला नशेत दाखवायचं होतं. त्यासाठी हिप्पींबरोबर नशेत वावरणं हा एक सोपा उपाय होता.

## सोनूला दिली होती 'दबंग 2'ची ऑफर

सोनू सूद बॉलीवूडमधील लोकप्रिय स्टार आहे. त्याने हिरोपेक्षा खलनायकाच्या भूमिकेतून चाहत्यांची मने जिंकली आहेत. २०१० मध्ये रिलीज झालेल्या सलमान खानच्या 'दबंग' चित्रपटात सोनू सूदने छेदी सिंहची भूमिका साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला होता. अलीकडेच सोनू सूदने एका मुलाखतीत त्याला 'दबंग २' मध्ये छेदी सिंहच्या भावाची भूमिका ऑफर झाली होती, पण त्याने ती नाकारली असे सांगितले आहे. 'ह्युमन्स ऑफ बॉम्बे'ला दिलेल्या मुलाखतीत सोनू सूद म्हणाला, "सलमान आणि अरबाज माझ्या कुटुंबातील सदस्यासारखे आहेत. त्यांनी मला 'दबंग २'मध्ये छेदी सिंहच्या भावाची भूमिका साकारण्यासाठी बोलावलं होतं, पण मी नकार दिला. कारण मला कोणत्याही प्रकारे ती भूमिका उत्साहित करत नव्हती. मी हे कारण त्यांना सांगितल्यावर त्यांनी "काही हरकत नाही" अशी प्रतिक्रिया दिली.सोनू सूद पुढे म्हणाला की, "'दबंग २'च्या प्रीमियरला सलमान खानने मला बोलावलं होतं आणि मी आनंदाने उपस्थित राहिलो". 'दबंग' चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये छेदी

## काय करावं लागतं हे बघितलं पाहिजे



झी मराठीवरील 'काहे दिया परदेस' या लोकप्रिय मालिकेमधून प्रेक्षकांच्या घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री म्हणजे सायली संजीव. या मालिकेत तिने साकारलेली गौरी आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. या मालिकेनंतर सायलीने अनेक मालिका व चित्रपटांमध्ये काम केलं आहे. अभिनय क्षेत्रात सक्रीय असणाऱ्या सायलीला राजकारणातही तितकाच रस आहे. त्यामुळे भविष्यात अभिनेत्री राजकारणात सक्रीय होणार आहे. सायली संजीवने नुकतीच 'सुमन म्युझिक मराठी'च्या 'आम्ही असं ऐकलंय' या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी सायलीला ती राजकरणात एन्ट्री करणार आहे का? यावर सायलीने तिची राजकारणात येण्यासाठीची इच्छा व्यक्त केली. तसंच राजकारणाला तरुणांनी करिअरचा एक पर्याय म्हणून बघितलं पाहिजे असं मतही व्यक्त केलं.याबद्दल सायली म्हणाली, "मला सक्रीय राजकारणात सहभागी होऊन काम करायचं आहे. मी जेव्हा राजकारणात येईन तेव्हा काही गोष्टी कदाचित बदललेल्या असतील. त्यामुळे मला आज ज्या समस्या आहेत त्याकडे बघून मी माझं तेव्हाचं ध्येय ठरवलं, तर त्याचा आता काय फायदा होणार नाही. तेव्हा त्याचा तसा संबंध नसेल."यापुढे ती म्हणाली, "मला लहानपणापासून वाटतं की, इथे घाण आहे, हा रस्ता खराब आहे, इथे पाणी नाही किंवा वीज नाही. काही ठिकाणी खड्डे तर आहेतच; पण साधा रस्तासुद्धा नाही. तर याबद्दल आपण सतत तक्रारी करण्यापेक्षा मला असं वाटतं की, आपण ते करुन बघू आणि जर ते आपल्याला जमलं तरच आपल्याला दुसऱ्यांना नावं ठेवण्याचा हक्क आहे. जर आपल्याला जमलं नाही तर ते काम खूप अवघड आहे."यानंतर सायली म्हणाली, "मला वाटतं की, आपण प्रयत्न करुन बघायला हवा. छान रस्ते, रस्त्याच्या दुतर्फा झाडे, स्वच्छता हवी, प्लॅस्टिक नको हे सगळं करण्यासाठी काय मेहनत लागते हे आपणही बघितलं पाहिजे.

## तो त्याच्या वडिलांसारखा

हेमा मालिनी बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहेत. त्यांच्या व धर्मेंद्र यांच्या प्रेमकहाणीबद्दल ९०च्या काळात खूप चर्चा झालेली. या जोडीने २ मे १९८० मध्ये लग्न केलं. धर्मेंद्र यांचं हे दुसरं लग्न होतं, त्यामुळे धर्मेंद्र यांची मुलं सनी देओल व बॉबी देओल हेमा यांच्याबरोबर फार बोलत नाहीत अशा चर्चा असतात. पण, हेमा मालिनी यांनी सनी व बॉबी या त्यांच्या सावत्र मुलांबद्दल एकदा प्रतिक्रिया दिलेली.धर्मेंद्र यांची दोन लग्न झाली असून त्यांना ६ मुलं आहेत. धर्मेंद्र व त्यांच्या पहिल्या पत्नी प्रकाश कौर यांना दोन मुलं व दोन मुली अशी ४ मुलं आहेत, तर हेमा मालिनी व धर्मेंद्र यांना २ मुली आहेत. हेमा मालिनी यांनी सिमी गरेवालला दिलेल्या मुलाखतीत त्यांच्या सावत्र मुलांबद्दल प्रतिक्रिया दिलेली. त्यांच्याबरोबर त्यावेळी त्यांच्या दोन मुली इशा व अहाना देओलही उपस्थित होत्या आणि इशा देओलनेही तिच्या दोन मोठ्या भावांबद्दल प्रतिक्रिया देत त्यांचं कौतुक केलेलं.हेमा मालिनी व त्यांच्या मुलींनी दिलेल्या मुलाखतीमधील क्लीप सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये इशा देओल तिच्या भावांबद्दल बोलताना दिसतेय. ती यामध्ये "आम्ही लंडनला जातो तेव्हा आम्ही बॉबी दादाबरोबर खूप वेळ घालवतो, आम्ही सनी दादाबरोबरही जास्तीत जास्त वेळ घालवण्याचा प्रयत्न करतो," असं म्हणालेली.सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या व्हिडीओमध्ये हेमा मालिनी यांना सनी देओल व बॉबी देओल हे दोघे एकमेकांपासून स्वभावाने वेगळे आहेत का असं विचारण्यात आलेलं. यावर त्या म्हणालेल्या, "ते दोघे खूप चांगले आहेत. सनी त्याच्या वडिलांसारखा आहे. तो धरमजींसारखाच बोलतो. त्याचा स्वभावही त्यांच्यासारखाच आहे. खूप चांगला आहे.




## 'तू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरी'ची नवीन तारीख

बॉलीवूड अभिनेता कार्तिक आर्यन आणि अभिनेत्री अनन्या पांडे पुन्हा एकदा पडद्यावर रोमान्स करण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्यांचा रोमँटिक चित्रपट "तू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरी" या वर्षी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. तथापि, चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख बदलली आहे. "तू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरी" मूळतः ३१ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार होता. तथापि, कार्तिक आणि अनन्याचा हा चित्रपट आता थोडा लवकर प्रदर्शित होईल. "तू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरी" ची नवीन प्रदर्शन तारीख जाहीर करण्यात आली आहे. हा चित्रपट आता २०२५ च्या ख्रिसमसला थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ यांचा "अल्फा" मूळतः २५ डिसेंबर रोजी प्रदर्शित होणार होता, परंतु निर्मात्यांनी त्याची प्रदर्शन तारीख पुढे ढकलली आहे. "तू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरी" आता "अल्फा" ऐवजी २५ डिसेंबर रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होईल.कार्तिक आर्यनने इंस्टाग्रामवर "तू मेरी मैं तेरा, मैं तेरा तू मेरी" या चित्रपटाचे नवीन पोस्टर शेअर केले आहे आणि चित्रपटाच्या नवीन प्रदर्शन तारखेची घोषणा केली आहे. पोस्टरमध्ये अभिनेता अनन्या पांडेला खांद्यावर घेऊन जात असल्याचे दाखवण्यात आले आहे. कार्तिकने कॅप्शन दिले आहे की, "मी पुन्हा येत आहे, यावेळी ख्रिसमससाठी, कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे यांच्या कामाच्या बाबतीतहा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. तो श्रीलीलासोबत "तू मेरी जिंदगी है" मध्ये देखील दिसणार आहे. तो "भूल भुलैया ४" चा देखील भाग आहे.

## ब्रायन लाराचा विक्रम मोडला — कर्णधार शे होपने मोठा विक्रम आपल्या नावे केला

# शे होपचं न्यूझीलंडविरुद्ध वादळी शतक!

## ६६ चेंडूत शतक पूर्ण केलं




। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात वनडे मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजचा कर्णधार शे होपने वादळी शतकी खेळी केली आहे. होपने अवघ्या ६६ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. होपच्या शतकातील सर्वात उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्याने कठीण परिस्थितीत फलंदाजीला येत संघाचा डाव सावरत शतकी खेळी केली. यादरम्यान त्याने दिग्गज ब्रायन लाराचा विक्रम मोडला आहे.**

शे होपचं हे १९ वे एकदिवसीय शतक होतं. होपच्या उत्कृष्ट खेळीमुळेच वेस्ट इंडिजने ३४ षटकांत २४७ धावांचा पल्ला गाठला. शे होपने ६९ चेंडूत १३ चौकार व ४ षटकारांसह १०९ धावांची उत्कृष्ट केळी केली. याशिवाय कोणताच फलंदाज ३० धावांचा टप्पा पार करू शकला नाही.न्यूझीलंडविरुद्ध वेस्ट इंडिजची सुरुवात खराब झाली. संघाने ४० धावांच्या आत दोन विकेट गमावल्या आणि ८६ धावांपर्यंत पोहोचताच निम्मा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. दुसऱ्या टोकाला उभे राहून, शे होपने आपल्या संघाला संघर्ष करताना पाहून खेळपट्टीवर पाय घट्ट रोवून उभा होता. यादरम्यान त्याने उत्कृष्ट फलंदाजी करत न्यूझीलंड संघाविरुद्ध वनडेमधील त्याचं पहिलं शतक झळकावलं.शे होपने या शतकी खेळीसह मोठा विक्रमही आपल्या नावे केला आहे. शे होप हा वेस्ट इंडिजसाठी सर्वात जलद ६ हजार वनडे धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला आहे. शे होपने १४२ डावांमध्ये ६ हजार धावा करण्याचा विक्रम केला आहे. यासह होपने ब्रायन लाराचा विक्रम मोडला आहे. ब्रायन लारा यांनी १५५ डावांमध्ये ६ हजार धावांचा टप्पा गाठला आहे.न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात वनडे मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजचा कर्णधार शे होपने वादळी शतकी खेळी केली आहे. होपने अवघ्या ६६ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. होपच्या शतकातील सर्वात उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्याने कठीण परिस्थितीत फलंदाजीला येत संघाचा डाव सावरत शतकी खेळी केली. यादरम्यान त्याने दिग्गज ब्रायन लाराचा विक्रम मोडला आहे. शे होपचं हे १९ वे एकदिवसीय शतक होतं. होपच्या उत्कृष्ट खेळीमुळेच वेस्ट इंडिजने ३४ षटकांत २४७ धावांचा पल्ला गाठला. शे होपने ६९ चेंडूत १३ चौकार व ४ षटकारांसह १०९ धावांची उत्कृष्ट

### ६ हजार धावा करणारा फलंदाज

होपच्या उत्कृष्ट खेळीमुळेच वेस्ट इंडिजने ३४ षटकांत २४७ धावांचा पल्ला गाठला. शे होपने ६९ चेंडूत १३ चौकार व ४ षटकारांसह १०९ धावांची उत्कृष्ट केळी केली. याशिवाय कोणताच फलंदाज ३० धावांचा टप्पा पार करू शकला नाही.न्यूझीलंडविरुद्ध वेस्ट इंडिजची सुरुवात खराब झाली. संघाने ४० धावांच्या आत दोन विकेट गमावल्या आणि ८६ धावांपर्यंत पोहोचताच निम्मा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. दुसऱ्या टोकाला उभे राहून, शे होपने आपल्या संघाला संघर्ष करताना पाहून खेळपट्टीवर पाय घट्ट रोवून उभा होता.

केळी केली. याशिवाय कोणताच फलंदाज ३० धावांचा टप्पा पार करू शकला नाही.न्यूझीलंडविरुद्ध वेस्ट इंडिजची सुरुवात खराब झाली. संघाने ४० धावांच्या आत दोन विकेट गमावल्या आणि ८६ धावांपर्यंत पोहोचताच निम्मा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. दुसऱ्या टोकाला उभे राहून, शे होपने आपल्या संघाला संघर्ष करताना पाहून खेळपट्टीवर पाय घट्ट रोवून उभा होता. यादरम्यान त्याने उत्कृष्ट फलंदाजी करत न्यूझीलंड संघाविरुद्ध वनडेमधील त्याचं पहिलं शतक झळकावलं.शे होपने या शतकी खेळीसह मोठा विक्रमही आपल्या नावे केला आहे. शे होप हा वेस्ट इंडिजसाठी सर्वात जलद ६ हजार वनडे धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला आहे. शे होपने १४२ डावांमध्ये ६ हजार धावा करण्याचा विक्रम केला आहे. यासह होपने ब्रायन लाराचा विक्रम मोडला आहे. ब्रायन लारा यांनी १५५ डावांमध्ये ६ हजार धावांचा टप्पा गाठला आहे.न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात वनडे मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजचा कर्णधार शे होपने वादळी शतकी खेळी केली आहे. होपने अवघ्या ६६ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. होपच्या शतकातील सर्वात उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्याने कठीण परिस्थितीत फलंदाजीला येत संघाचा डाव सावरत शतकी खेळी केली. यादरम्यान त्याने दिग्गज ब्रायन लाराचा विक्रम मोडला आहे. शे होपचं हे १९ वे एकदिवसीय शतक होतं.

# रोहित शर्माकडून हिसकावलं पहिलं स्थान

## 46 वर्षांत पहिल्यांदाच ‘या’ संघाचा खेळाडू ठरला नंबर वन




। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा माजी कर्णधार व मुंबईचा राजा अशी ओळख असलेल्या रोहित शर्मानं टी-२०, कसोटीत निवृत्तीनंतर वनडे मालिकेत दणक्यात पुनरागमन केलं होतं. ऑस्ट्रेलियाविरुद्ध वनडे मालिकेत रोहित शर्मानं सर्वाधिक धावा करत मालिकावीर होण्याचा मान मिळवला. या मालिकेनंतर आयसीसी क्रमवारीत रोहित शर्मा वनडेमधील अव्वल फलंदाज ठरला.**

पण आता पुढील मालिकेपूर्वी रोहित शर्मानं आपले पहिले स्थान गमावले आहे.रोहित शर्मानं तीन आठवड्यांनी एकदिवसीय क्रिकेटमधील नंबर १ स्थान गमावलं आहे. आयसीसीच्या ताज्या एकदिवसीय क्रमवारीत रोहित शर्मा पहिल्या स्थानावरून दुसऱ्या स्थानी घसरला आहे. तर रोहित शर्माशिवाय शुबमन गिल व विराट कोहली अनुक्रमे चौथ्या व पाचव्या स्थानी कायम आहेत.आयसीसी वनडे क्रमवारीत रोहित शर्माच्या जागी पहिल्या स्थानी न्यूझीलंडचा मधल्या फळीतील फलंदाज डॅरिल मिचेलने स्थान मिळवलं आहे. डॅरिल मिशेलने ७८२ रेटिंग गुणांसह पहिलं स्थान मिळवलं आहे. रोहित शर्मा त्याच्यापेक्षा फक्त एक गुणाने मागे आहे. डॅरेल मिचेल यापूर्वी तिसऱ्या क्रमांकावर होता. मिचेल रोहित व इब्राहिम झादरानला मागे टाकत पहिलं स्थान गाठलं.४७ वर्षांनंतर, न्यूझीलंडचा फलंदाज पहिल्यांदाच वनडे क्रमवारीत पहिल्या स्थानी पोहोचला आहे. यापूर्वी ग्लेन टर्नर १९७९ मध्ये अव्वल वनडे फलंदाज बनला होता आणि आता डॅरिल मिचेलने ही कामगिरी केली आहे. आहे जो तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळला आहे. या खेळाडूने ३३ सामन्यांमध्ये ४४ पेक्षा जास्त सरासरीने २१३९ धावा केल्या आहेत.

### वनडेत सात शतके केली आहेत

एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ५३.१३ च्या सरासरीने २३३८ धावा केल्या आहेत. मिचेलने एकदिवसीय सामन्यांमध्ये सात शतके केली आहेत.डॅरिल मिचेलने २०२५ मध्ये वनडेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याने या वर्षी १६ डावांमध्ये ५४.३५ च्या सरासरीने ७६१ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने एक शतक आणि सहा अर्धशतकं केली आहेत.

स्मार्ट PCMC
# महाईन्यूज
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार।
। दि. 20 नोव्हेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## डी. वाय. पाटिल कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आकुर्डी येथे एआयसीटीई नवी दिल्ली

# ‘युनिव्हर्सल ह्यूमन व्हॅल्यू‘उपक्रमाला प्रतिसाद!

### शिक्षण विश्व : डी वाय पाटिल कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आकुर्डी येथे कार्यशाळेचे आयोजन

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**डी वाय पाटिल कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आकुर्डी येथे ऐआयसीटीई नवी दिल्ली मान्यताप्राप्त युनिव्हर्सल ह्यूमन व्हॅल्यू या विषयावरील तीन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. डी वाय पाटिल शैक्षणिक संकुलाचे संचालक रियर एडमिरल अमित विक्रम यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले**



उपस्थितांमध्ये ऐआयसीटीआयई नवी दिल्लीचे प्रमुख प्रशिक्षक महेश कोलते ,सहाय्यक प्रशिक्षक अनिता माने, निरीक्षक रेवती देशपांडे ,संकुलाचे मुख्य वित्तीय अधिकारी बिपिन शर्मा , महाविद्यालयाच्या प्राचार्या पी मालती आणि प्रशासकीय अधिष्ठाता संदीप सरनोबत होते

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महेश कोलते यांनी आपल्या भाषणात ऐआयसीटीई विद्यार्थी प्रेरण कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या युनिव्हर्सल ह्यूमन व्हॅल्यूज प्राध्यापक विकास कार्यक्रम युएचविआय’चा उद्देश स्पष्ट केला त्यांनी सांगितले की हा कार्यक्रम प्राध्यापकांना मूल्याधारित शिक्षण अध्यापन पद्धतीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन करणारा आहे तसेच सार्वत्रिक मानवी मूल्ये समग्र मानवी विकासासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. रियर एडमिरल अमित विक्रम यांनी आपल्या भाषणात प्रत्येकाच्या आयुष्यात शिस्त आणि मूल्यांचे महत्व अधोरेखित केले तसेच संकुलामध्ये राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहितीही दिली

महाविद्यालयाच्या प्राचार्या पी मालती यांनी या कार्यशाळेचा उद्देश प्राध्यापकांनी मूल्यांची ओळख करून ती वैयक्तिक व शैक्षणिक जीवनात लागू करण्याचा आहे असे सांगितले त्यांनी प्राध्यापकांना शिक्षण पद्धतीत मूल्याधारित दृष्टिकोन आत्मसात करण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाविषयी सविस्तर माहिती देत लतिका देसाई यांनी उपस्थितांचे स्वागत केले कार्यशाळेची नियमावली आणि FDP संदर्भातील माहिती अनिता माने आणि रेवती देशपांडे यांनी दिली. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख अशोक मोरे युएचविआय अधिष्ठाता लतिका देसाई आणि ईएनटीसी विभागाच्या मनीषा राजपूत कार्य पाहत आहेत.

# प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी होणार प्रसिद्ध

### आठ क्षेत्रीय कायलियांमध्ये उपलब्ध; आजपासूनच यादीची विक्रीही सुरु होणार

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठीची ३२ प्रभागांची प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी गुरुवार (दि. २०) रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदार यादी महापालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN या संकेतस्थळावर तसेच सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उपलब्ध राहणार असून त्याच दिवशी यादीची विक्रीही सुरू होणार आहे.**



महापालिकेच्या मतदार यादी कक्षाने पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि भोर विधानसभा मतदारसंघातील मतदारांची नावे फोडून प्रभागनिहाय यादी तयार केली आहे. त्यात १ जुलै २०२५ पर्यंत नोंदणी केलेल्या मतदारांचीच नावे आहेत. त्यानंतर नोंदणी झालेल्यांना महापालिका निवडणुकीत मतदान करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**यादी प्रसिद्धीचा दिवस बदलत राहिला...**

या यादीची घोषणा ६ नोव्हेंबरला होणार होती. त्यानंतर दिनांक बदलून १४ नोव्हेंबर निश्चित करण्यात आला होता. मात्र, राज्य निवडणूक आयोगाने पुन्हा दिवस बदलल्याने यादी अखेर २० नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे. प्रभागनिहाय मतदार यादी आयोगाच्या संगणक प्रणालीवर अपलोड झाल्यामुळे मार्ग मोकळा होणार आहे.

**हरकती–सूचना लेखी स्वरूपात स्वीकारणार...**

मतदार यादीसंदर्भातील हरकती आणि सूचना २० ते २७ नोव्हेंबर या कालावधीत स्वीकारल्या जाणार आहेत. यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृह (पहिला मजला), गांधीनगर, पिंपरी, महापालिकेची सर्व आठ क्षेत्रीय कार्यालये ही दोन ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. हरकतींवरील निर्णयानंतर अंतिम मतदार यादी ५ डिसेंबरला, मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी ८ डिसेंबरला आणि मतदान केंद्रनिहाय यादी १२ डिसेंबरला प्रसिद्ध केली जाणार आहे.

**यादी विक्री व केंद्र...**

प्रभागनिहाय मतदार यादीची प्रत विक्रीसाठी गुरुवारपासून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात उपलब्ध होणार आहे. मतदान केंद्र ठिकाणी निश्चित करण्याचे काम संबंधित अधिकारी अंतिम टप्प्यात करत असल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली.

## जेजुरी नगरपरिषद निवडणुकीला वेग

# जेजुरी : शिवसेना शिंदे गटाच्या अमृता भोसले यांचा अर्ज दाखल

### महिलांच्या सुरक्षेसह स्थानिक पायाभूत सुविधांच्या उभारणीवर भर देण्याचे अमृता भोसले यांचे आश्वासन

। जेजुरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जेजुरी नगरपरिषद निवडणुकीला वेग येत असताना शिवसेना शिंदे गटाच्या महिला नेतृत्वाला विशेष प्राधान्य देण्यात येत आहे. लवथळेश्वर प्रभागातून अॅड. अशोक भोसले यांच्या पत्नी आणि उच्चशिक्षित कायदातज्ज्ञ अमृता भोसले यांनी शिंदे गटाच्या शिवसेनेतून अधिकृतरित्या अर्ज दाखल केला..**

अर्ज भरल्यानंतर अध्यक्ष पदाचे उमेदवार विठ्ठल सोनवणे आणि नगरसेवक उमेदवार गणेश भोसले यांच्या उपस्थितीत शिवाजी चौकातील जेजुरीच्या ऐतिहासिक पहिल्या पायरी मार्गाचे दर्शन घेऊन प्रचाराला औपचारिक सुरुवात करण्यात आली.

अमृताताई भोसले या कायद्याचे शिक्षण घेत असून सामाजिक भान जपत लवथळेश्वर विभागातील पाणीपुरवठा, रस्ते, सुरक्षितता आदी प्रश्नांवर सातत्याने काम करीत आहेत. विशेषतः महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न, मुलांच्या सुविधा आणि स्थानिक पातळीवरच्या अनेक तक्रारी यावर त्या नियमितपणे जनजागृती करतात.

आगामी निवडणुकीत निवडून आल्यास महामार्गांवर होत असणारे अपघात रोखण्यासाठी तसेच महिलांना व विद्यार्थ्यांना सुरक्षित ये-जा करता यावी यासाठी पायाभूत सुविधा उभारण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्या म्हणाल्या. आपल्या शिक्षणाचा आणि समर्थ विचारांचा उपयोग समाजातील गरजू घटकांसाठी करणे हा आपल्या उमेदवारीमागील मुख्य हेतू असल्याचा त्यांनी पुनरुच्चार केला. मतदारांनी आपल्याला साथ देऊन जेजुरीच्या विकासयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन अमृताताईंनी केले. त्यांच्या उमेदवारीचे शहरात सर्वत्र स्वागत होत आहे.



> “जेजुरीतील प्रत्येक कुटुंब सुरक्षित, सक्षम आणि सशक्त व्हावे, हीच माझी प्राथमिकता आहे. महिला आणि विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे, तसेच अपघातमुक्त महामार्गासाठी ठोस पावले उचलणे हे माझे प्रमुख ध्येय आहे. विकास हा घोषवाक्य नसून प्रत्यक्षात उतरलेल्या कामातूनच सिद्ध होतो, आणि तेच काम करण्यासाठी मी लोकांसमोर उभी आहे.”
>
> **-अॅड. अमृता भोसले,** शिवसेना

